




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १५० । शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# नियम मोडणाऱ्या ७६१ वाहनचालकांना दणका

### नगर शहरात धडक मोहीम । पावणेआठ लाख रुपयांचा दंड



## मोहीम सुरूच राहणार



**अहिल्यानगर शहरामध्ये यापुढे देखील फॅन्सी नंबरप्लेट व नंबरप्लेट न लावणे, लायसन्स सोबत न बाळगणे, ट्रिपलशीट वाहन चालविणे, काळी काच असलेले, बुलेट फटाका सायलेन्सर, मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, अल्पवयीन मुलांनी वाहन चालविल्यास कारवाई सुरु ठेवण्यात येणार आहे, असे आवाहनउपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांनी केले आहे.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहर उपविभागात दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत नियम मोडणाऱ्या ७६१ वाहनांवर कारवाई करण्यात आली तर सात लाख ७७ हजार ४५० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

अचानक नाकाबंदी लावून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना पोलिसांनी दणका दिला. फॅन्सी नंबरप्लेट व नंबर प्लेट नसलेल्या ३०६, लायसन्स सोबत न बाळगणे १९३, ट्रिपलशीट वाहन चालविणे ३९, काळी काच असलेले १३, बुलेट फटाका सायलेन्सर ११, ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह ४, अल्पवयीन मुलांनी वाहन चालविणे २ अशा एकूण ७६१ वाहनांवर मोटर वाहन अधिनियमानुसार कारवाई करुन ७ लाख ७७ हजार ४५० रुपयांचा दंड करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवाली चे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, भिंगार कॅम्पचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

# शरद पवार मोठे नेते, पण शिवसेना राज्यसभेच्या जागेचा दावा सोडणार नाही

### आदित्य ठाकरेंनंतर वरूण सरदेसाई यांचाही दावा । मविआत एका जागेसाठी रस्सीखेच

**मुंबई । वृत्तसंस्था –** राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचा कार्यकाळ एप्रिल महिन्यात संपत असल्याने शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार का याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. कारण, गेल्या काही दिवसांपासून ते रुग्णालयात आहेत. त्यामुळे, प्रकृतीच्या कारणास्तव ते थांबणार की पुन्हा राज्यसभेवर जाणार याचं कोडं पुढील काही दिवसांतच उलगडेल. मात्र, राज्यसभेच्या एका जागेवर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांकडून दावा केला जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरेंनंतर आता आमदार वरुण सरदेसाई यांनीही दावा केला आहे.

राज्यसभेच्या जागेसाठी कुठल्याही परिस्थितीत आम्ही आमचा दावा सोडणार नाही, आमच्या पक्षातील आमदारांनी उद्धव ठाकरेंसमोर आपलं मत मांडले आहे. सन २०२० साली आम्ही राष्ट्रवादीच्या फौजिया खान यांच्या उमेदवारीवेळी मदत केली होती. त्यानंतर संजय पवार आमचे उमेदवार दिलेले असताना आणि संख्याबळ असताना सुद्धा ते पराभूत झाले. आता संख्याबळानुसार आमचं संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे जर आमचा खासदार कार्यकाळ पूर्ण करत असेल तर आमच्याच पक्षाचा उमेदवार राज्यसभेसाठी जाईल, असे वरुण सरदेसाई यांनी म्हटले.

शरद पवार हे मोठे नेते आहेत, शरद पवार उमेदवार म्हणून इच्छुक असतील आणि त्यांच्या नेत्यांकडून तसेच महाविकास आघाडीकडून तसं बोललं गेलं तरीही आम्ही आमचा राज्यसभेच्या जागेसाठीचा दावा सोडणार नाहीत, अशा शब्दात वरुण सरदेसाई यांनी राज्यसभेच्या जागेवर ठाकरेंच्या शिवसेनेचा दावा केला आहे. विधान परिषद आणि ■ पान ४ वर






# छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

### पैठणचा जुगार माफिया फेरोज पठाण अंतर्गत हर्सूल कारागृहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात मोठी कारवाई करत पैठणमधील सराईत जुगार माफिया फेरोज रशीद पठाण याला महाराष्ट्र प्रतिबंधात्मक कायद्यान्वये एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर आरोपीला हर्सूल मध्यवर्ती कारागृह येथे रवाना करण्यात आले.

**काय आहे प्रकरण ?**

फेरोज रशीद पठाण (वय ३५, रा. हमाल गल्ली, पैठण) हा परिसरात दहशत निर्माण करून ऑनलाईन जुगार व मटका चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या अवैध व्यवसायामुळे अनेक कष्टकरी कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. कायद्याची भीती न बाळगता तो बेकायदेशीर धंदे सुरू ठेवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

**१८ गुन्हे दाखल, तरीही सुधारणा नाही**

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये तब्बल १८ गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ११० नुसारही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्याच्या गुन्हेगारी कारवायांमध्ये कोणतीही घट झाली नव्हती.

**कायद्याचा वापर**

'धोकादायक व्यक्ती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आरोपीवर महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले व औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत () कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पैठण पोलिसांनी ठोस पुरावे सादर केले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित केले. आदेशानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला कारागृहात दाखल केले.

पथकाची कामगिरी

या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपुत ■ पान ४ वर

# सतर्कतेमुळे सायबर फसवणूक टळू शकते – सागर ढिकले

### डिजिटल अरेस्ट प्रकारांना घाबरू नये : सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांचे आवाहन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. मात्र नागरिकांच्या सतर्कतेमुळे हे प्रकार टळू शकतात, डिजिटल अरेस्ट ही संकल्पना कायद्यात अस्तित्वात नसल्याने अशा प्रकारांना घाबरू नये असे आवाहन सायबर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.

एचडीएफसी व सायबर पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षा आणि करिअर संधी याविषयी आयोजित विशेष कार्यशाळेत श्री ढिकले बोलत होते. कार्यशाळेत उपस्थित जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करतांना श्री ढिकले म्हणाले की,

स्मार्टफोन व सोशल मीडिया हे सायबर फसवणुकीचे मूळ आहे. त्यामुळे सोशल मीडिया हाताळताना अतिशय सतर्क रहावे. बँक, महावितरण, फोन पे, गुगल पे, ॲमेझॉन, आर्मी किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून बोलत असल्याची बतावणी करणाऱ्यांना आपल्या बँकेची, एटीएमची, क्रेडिट कार्डची माहिती किंवा ओटीपी देऊ नये. तसेच त्यांच्या सांगण्यावरून कोणतेही ॲप डाऊनलोड करू नये.

अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून किंवा क्यू आर कोड स्कॅन करू नये. ओएलएक्स, फेसबुक, इंस्टाग्राम, क्विकर यासारख्या सोशल मीडिया साईट वरून अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करू नये, त्यांना पैसे पाठवू नये. शेअर मार्केटमध्ये गुंतवण्यासाठी लोभापोटी अनोळखी व्यक्तींना पैसे पाठवू नयेत. लोन ॲप वरून लोन घेणे टाळावे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात फसवणुकीचे प्रकार वाढलेले आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम, जीमेल, व्हाट्स ॲपमध्ये टू स्टेप वेरिफिकेशन ही सेटिंग करून आपले सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग होण्यापासून वाचवता येऊ शकते. याचबरोबर सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींच्या आलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नयेत. आदी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना श्री ढिकले यांनी यावेळी केल्या.

सायबर फसवणूक कशाप्रकारे होते, याची अनेक उदाहरणे देऊन यापासून कसे वाचावे याबाबत मार्गदर्शन केले. यासंदर्भातील माहितीपत्रके सायबर पोलीस स्टेशनच्यावतीने उपस्थित जेष्ठ नागरिकांना वितरित करण्यात आली. याकरिता जेष्ठ नागरिकसौ सुलभा श्रीकृष्ण लांडगे यांचे सहकार्य लाभले. अनोळखी व्यक्तींच्या मागणीवरून कधीही ओटीपी शेअर करू नये. सोशल मीडियावरील फसव्या जाहिरातींच्या मोहाला बळी पडू नये. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या क्रमांकावर संपर्क साधावा याचबरोबर आपल्या नजीकच्या पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवावी. तसेच https://cybercrime.gov.in या वेबसाईटवर जाऊन तात्काळ ऑनलाईन तक्रार नोंदवावी इत्यादी महत्त्वपूर्ण माहिती श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

या कार्यशाळेदरम्यान जेष्ठ नागरिकांसाठी एचडीएफसीच्या इन्वेस्टमेंट प्रोडक्टची माहिती मुख्य शाखाधिकारी ओंकार कोकाटे, विस्तार अधिकारी पिराजी गुंजाळ, श्रीपाद पाठक यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी सायबर पोलीस स्टेशनचे अभिजीत अरकल, प्रशांत जाधव यांसह मोठ्या संख्येने विविध शासकीय खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.


## चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे

## जोशी महाराज (संत बाळूमामा प्रसन्न)

पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो; परंतु चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे, ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही चेहरा पाहून भविष्य सांगतो. मंगलकार्य, व्यवसाय, शेती आणि वास्तुशास्त्राचे भाकित ते त्या-त्या घरातील कुटुंब प्रमुखाचा चेहरा पाहून करतो.

राजकीय क्षेत्रातील अनेकांबद्दल आम्ही सांगितलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाईन, राजकीय, सामाजिक, मराठी, हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमॅन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे आम्ही भविष्य सांगितले आहे आणि ते खरेही ठरले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यासारख्या जागा मग त्या मालकीच्या किंवा भाडेतत्त्वावर असल्या, तरी आम्ही भविष्य सांगतो. वास्तुदोष, पितृदोष, कालसर्पदोष, नागबळी दोष, नजरदोष इ. दोष टाळण्यासाठी आम्ही उपासनाही सांगतो. इतकेच नव्हे, तर स्त्री- पुरुष यांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. जमीन, नोकरी, व्यवसाय, संतती, लग्नविवाह आदींसह अन्य अडीअडचणींवर मार्ग सांगतो. कोणत्याही प्रकारच्या कठीण ते अतिकठीण अडचणींवर ते मार्ग सांगून मार्गदर्शन करतो. आतापर्यंत आपण सांगितलेले सर्व भविष्य खरे ठरले आहे, असा आमचा दावा आहे.



**राजकीय व व्यावसायिक भविष्य वर्तविणारे**
**अनुभवसिद्ध ज्योतिषी जोशी महाराज**

मु. पो. कडा कारखाना, ता. आष्टी, जि. बीड मो. 9075174343 / 9006239009

## दै. आकर्षण निवडक

### पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गणेश चव्हाण यांचा स्नेहबंध तर्फे सन्मान




अहिल्यानगर - अहिल्यानगर पोलीस दलामध्ये सन २००६ मध्ये भरती झालेले पोलीस हवालदार गणेश रामदास चव्हाण यांनी आपल्या सेवाकाळात केलेल्या उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरीबद्दल ५०० हून अधिक बक्षिसे प्राप्त केली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांच्याकडून त्यांना अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या सन्मानाच्या निमित्ताने स्नेहबंध सोशल फौंडेशन यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी पोलीस हवालदार गणेश चव्हाण यांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, पोलीस उपअधीक्षक (शहर) डॉ. दिलीप टिपरसे यावेळी उपस्थित होते. मान्यवरांनी गणेश चव्हाण यांच्या कामगिरीचे कौतुक करत ती पोलीस दलातील तरुण कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. ''पोलीस दलातील प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व समाजाभिमुख अधिकारी हेच समाजाच्या सुरक्षिततेचा खरा आधारस्तंभ आहेत. गणेश चव्हाण यांची कामगिरी प्रत्येक पोलिसांसाठी प्रेरणादायी आहे.'' डॉ. उद्धव शिंदे, संस्थापक अध्यक्ष, स्नेहबंध सोशल फौंडेशन.

### जगातील फक्त नगरची भूमी अवतार मेहेरबाबानी निवडली

अहिल्यानगर- अवतार मेहेरबाबाच्या जन्मोस्तव दि २५ फेबुरवारी रोजी जगात मोठ्या उत्साहात साजरा झाला त्या निमित्ताने नगरमध्ये कार्यक्रम होत आहे,मेहरबाबा जगात फिरले पण त्यांनी अहमदनगरची भूमी निवडली व येथेच स्थिरावले,ते नगरजवळील वांबोरी रोडवरील पिपळगाव माळवी येथील आश्रमात राहत असत तर त्याची समाधी अरणगाव येथे मेहेरबाद येथे आहे याठिकाणी सतत मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी व शांतीसाठी राज्यातून,भारतातून व जगातून येत असतात अशी माहिती त्यांच्या कार्या विषयी,त्याचा आध्यत्मिक विषयी माहिती नगर सेन्टरचे अध्यक्ष डॉ मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली नगर जिल्हा संतांचा जिल्हा आहे.या ठिकाणी अनेक अवतारी पुरुष,साधुसंत होवुन गेलेले आहेत.ज्यांनी सर्वधर्म एकच आहे हा संदेश दिला.असेच अवतार मेहेरबाबा अहमदनगर मध्ये होते.त्यांचे असंख्य भक्त आज भारतातच नव्हे तर परदेशात सुद्धा आहेत. तसेच असंख्य आश्रमही आहेत.अवतार मेहेरबाबा सर्व धर्मावर प्रेम, सर्व धर्माची पूजा करीत,परंतु आपण कोणत्याच धर्माचे नाही किंवा कोणता नवीन धर्म स्थापन करुन मानवाला मानवा पासुन वेगवेगळे करुन त्यांच्यात भ्रम वाढवु इच्छित नाही असे मेहेरबाबा म्हणत. मेहेरबाबांचा जन्म पुणे येथे २५फेब्रुवारी१८९४ रोजी झाला.कॉलेजनंतर ते अध्यात्मिक क्षेत्राकडे वळले. शिर्डीचे साईबाबा,शिर्डी जवळील साकुरीचे उपासनी महाराज,पुण्याचे हजरत बाबाजान,नागपूरचे ताजुद्दीन बाबा,दौंड जवळील केडगांव बेटचे नारायण महाराज हे त्यांचे अध्यात्मिक गुरु होते. सर्व जातीधर्मातील लोकांना मानवतेचा संदेश देत पुढे त्यांनी जगभर प्रवास केला. १९२३ साली बाबा अहमदनगरला प्रथम आले होते. त्यांच्या अरणगांव(मेहेराबाद) येथील कुटीवर सर्व धर्माचे प्रतीक म्हणुन सात रंगाचा ध्वज लावण्यात आला.याच ठिकाणी त्यांनी १९२५ला धर्मार्थ दवाखाना व मोफत शाळा सुरु केली.बाबांनी१० जुलै १९२५ ते शेवटपर्यंत म्हणजे ३१ जानेवारी १९६९, असे ४४ वर्षे मौनव्रत पाळले.या काळात ते कोणाशीच बोलले नाही.यातच त्यांनी भारतात अनेक ठिकाणी व१३ वेळा अध्यात्म प्रचारासाठी जगप्रवास केला. त्यांनी गॉडस स्पिक,लिसन ह्युमिनिटी,परफेक्ट मास्तर,अवतार आदी ग्रंथ लिहीले.जगात कोठेही माझे निधन झाले तरी माझी समाधी अरणगांव(मेहेराबाद)येथेच बांधावी असे बाबांनी आपल्या भक्तांना सांगुन ठेवले होते.हेच ठिकाण आता मेहेराबाद म्हणुन प्रसिद्ध आहे.शेवटचा काळ त्यांनी पिंपळगांव माळवी(मेहेराझाद) येथे घालविला.तेथेच त्यांचे ३१ जानेवारी१९६९ रोजी महानिर्वाण झाले.नंतर त्यांची समाधी मेहेराबाद येथे बांधण्यात आली.

## अवैध वाळू तस्करी आणि वाळूतस्कारांच्या मुजोरीचा मुद्दा अधिवेशनात

### आमदार काशिनाथ दाते सरांचा ठाम आवाज




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात पारनेर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करांच्या मुजोरीतून वाढत चाललेल्या अपघातांच्या घटनांचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

आमदार दाते सरांनी लक्ष वेधताना सांगितले की, तालुक्यातील काही नदीपात्रांमधून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असून ओव्हरलोड ट्रक व डंपर वेगाने धावत असल्याने रस्ते धोकादायक बनले आहेत. अशाच एका पारनेर तालुक्यातील बोकनकवाडी ते वासुंदा रोडवर घडलेल्या अपघाताच्या घटनेत भरधाव डंपरने संतोष नऱ्हे नावाच्या दुचाकीस्वारास धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर चालकाने सबंधित जखमी तरुणास मदत न करता रस्त्यावरच डंपरमधील वाळू खाली करून पसार झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचेही त्यांनी सभागृहात नमूद केले.

या अपघातामुळे केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही, तर अवैध वाळू वाहतुकीचा धोका किती भीषण आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले. दाते सरांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाने नेमकी कोणती पावले उचलली आहेत? दोषींवर कठोर कारवाई होणार का? तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी **निश्चित करण्यात येणार का?**

अवैध वाळू उपसा केवळ महसुलाचे नुकसान करत नाही, तर सामान्य नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण करतो, असे स्पष्ट करत आमदार काशिनाथ दाते सरांनी या प्रकरणात सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी सभागृहात ठामपणे मांडली.

## 'मेरी लाईफ थीम प्रोजेक्ट' जिल्हास्तरीय स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरचा तृतीय क्रमांक




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण अहिल्यानगर तर्फे आयोजित 'मेरी लाईफ थीम प्रोजेक्ट' या जिल्हास्तरीय खुल्या स्पर्धेमध्ये सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभाग या प्रशालेस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक बांधिलकी या उद्दिष्टांवर आधारित या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी मधील विद्यार्थी चि. स्वराज शिंदे, रुद्रप्रताप राशिनकर आणि कुमारी अंकिता राऊत यांनी प्रभावी सादरीकरण करून परीक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी 'मेरी लाईफ' या संकल्पनेशी सुसंगत पर्यावरणपूरक जीवनशैली, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर सर्जनशील मांडणी केली.

स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव माननीय श्री धर्मवीर सालविठ्ठल, भारतीय वनसेवा तसेच श्री सुरेश खामकर, अध्यक्ष हरियाली संस्था यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत पर्यावरण संवर्धनासाठी तरुण पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल प्रशालेचे शालेय समितीचे चेअरमन माननीय ॲड. किशोर देशपांडे सर, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी आणि पर्यवेक्षक श्री एल. एम. कुलकर्णी सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्रशालेतील सौ. मनीषा अंबाडे व सौ. प्रियांका बांगर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाच्या या यशामुळे सावेडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पर्यावरणविषयक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग ही सकारात्मक बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## अहिल्यानगरमध्ये द्विराज्यीय संयुक्त नाट्य उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हौशी प्रायोगिक कलावंत संघ (अहिल्यानगर जिल्हा शाखा) आणि गोवा कला व संस्कृती संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महा गोमंतक संगमोत्सव या सोहळ्यात दोन सर्जनशील मराठी नाट्यप्रयोगांचा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि प्रेक्षकांच्या भरभरून प्रतिसादात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

दि. २३ फेब्रुवारी रोजी सादर झालेल्या संगीत सावता माळी या संगीतप्रधान नाटकाने भक्तिरस, श्रमपूजा आणि वारकरी परंपरेचा सुरेल आविष्कार रंगमंचावर साकारत रसिकांना मंत्रमुग्ध केले. कलाकारांच्या प्रभावी अभिनयासह संगीताची सुरेल साथ आणि नेटक्या नेपथ्यामुळे सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. या सोहळ्यासाठी संगीत क्षेत्रातील मान्यवर पवन नाईक, धनश्री खरवंडीकर आणि मंगल पाठक उपस्थित होते.

तसेच दि. २४ फेब्रुवारी रोजी सादर झालेल्या नटसम्राट या नाटकाने रंगभूमीवरील भावविश्व पुन्हा एकदा जिवंत केले. जीवनाच्या उत्तरार्धातील कलाकाराची वेदना, स्वाभिमान आणि कलेप्रती असलेली निष्ठा यांचे सशक्त चित्रण पाहून सभागृहातील वातावरण भारावून गेले. दोन्ही नाट्यप्रयोग माऊली सभागृह येथे संपन्न झाले. दोन राज्यांतील सांस्कृतिक संस्थांनी संयुक्तरीत्या असा उपक्रम राबविल्याने अहिल्यानगरच्या सांस्कृतिक वर्तुळात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

कलाभूषण पुरस्कार प्रदान

महा गोमंतक संगमोत्सव या कार्यक्रमाच्या निमित्ताने गोव्याचे ज्येष्ठ रंगकर्मी भालचंद्र उसगावकर यांना हौशी प्रायोगिक कलावंत संघाच्या वतीने यावर्षीचा ''कलाभूषण'' पुरस्कार प्रदान करण्यात आला. रंगभूमीवरील त्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे व संस्थेचे मार्गदर्शक सतीश लोटके यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला. उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव केला.

विशेष सहकार्य उपक्रमासाठी कुंश मसाले, नगर जिमखाना, ग्लोबल व्हिजन अकॅडमी, सुनील वनाजी राऊत आणि अभिजित दरेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संघाचे अध्यक्ष संजय लोळगे यांनी सर्व सहकाऱ्यांचे, कलाकारांचे व रसिक प्रेक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाना मोरे, संदीप येळवंडे, प्रसाद भणगे, गणेश लिमकर, विनोद गरुड, शैलेश देशमुख, कल्पना सावंत, डॉ. स्नेहा रानडे आणि सिद्धी कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अविनाश कराळे यांनी केले.अहिल्यानगरच्या सांस्कृतिक क्षेत्रात या द्विराज्यीय नाट्यउपक्रमाची नोंद एक संस्मरणीय पर्व म्हणून घेतली जात आहे.

## संत एकनाथ महाराज षष्ठी महोत्सवासाठी प्रशासन सज्ज

### भाविकांना चोवीस तास सुविधा; शहरात कडक बंदोबस्ताचे नियोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत एकनाथ महाराज षष्ठी महोत्सवानिमित्त पैठण शहरात आध्यात्मिक वातावरण राखत उत्सव शांततेत पार पडावा, यासाठी प्रशासनाने सर्वंकष तयारी सुरू केली आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

महोत्सवादरम्यान भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, अखंड वीजपुरवठा, आरोग्य तपासणी व उपचार सुविधा चोवीस तास उपलब्ध राहतील, याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरात स्वच्छता मोहीम राबविणे, तात्पुरती शौचालये उभारणे, दिंड्यांचे नियोजन करणे आणि दिशादर्शक फलक लावणे यावर भर देण्यात आला.

सुरक्षेच्या दृष्टीने ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, महिला पोलिसांचा बंदोबस्त वाढविणे, जड वाहनांना शहरात प्रवेशबंदी करणे तसेच अवैध धंदे व मटका बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाकडून तपासणी करून परवानगीशिवाय खाद्यपदार्थांची दुकाने लावू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले. महोत्सव काळात शहरात शिस्त आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

## सुप्रसिद्ध लेखक वसु भारद्वाज यांच्या भारतीय तत्त्वज्ञान – स्वरूप व सिद्धांत या पुस्तकास महाराष्ट्र शासनाने सन्मानचिन्ह व रुपये एक लाख पुरस्कार दिलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांच्याबरोबर ॲड. प्रज्ञा असनीकर यांनी साधलेला संवाद

वसुजी आपले अभिनंदन..
आपले बालपण व आपल्यावर झालेले लेखन संस्कार जाणून घेण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.
माझे बालपण मराठवाड्यातील जालना या शहरामध्ये गेले. मित्रांबरोबर मैदानी खेळ खेळण्यात आमचा सारा दिवस जात असे. तत्कालीन कुटुंब हीच शाळा असल्यामुळे घरामध्येच सर्व संस्कार होत असत. घरामध्ये गरिबी असल्याने स्वावलंबन हे आमचे ब्रीदवाक्य होते. शेणाने घर सारवण्यापासून सर्व कामे करावी लागत. अभ्यासासाठी नगरपालिकेचा पथदिप वापरावा लागे. शाळेतली गंमत म्हणजे, शाळेत असताना माझ्या गृहपाठाच्या वह्या कधीही पूर्ण नव्हत्या, परंतु वाचनाच्या बाबतीत म्हणाल तर शाळा सुरू होण्यापूर्वी त्या इयत्तेचे सर्व पुस्तकं मी वाचून काढलेले असत.
लहानपणी मला एक दुर्धर आजार झाला होता. त्यामुळे काही महिने शाळेत व बाहेर कुठेही न जाता आल्यामुळे वाचन संस्कार रुजला व मी अखंड वाचू लागलो. स्वामी विवेकानंदांचे भक्तीयोग, सत्येंद्रनाथ मुजुमदार यांनी लिहिलेलं स्वामी विवेकानंदांचे चरित्र आणि आश्चर्य म्हणजे महाभारताचे सात आठ खंडही मी या काळात वाचून पूर्ण केले.
या वाचनाने भगवंत, गुरु, आणि ईश्वर यांच्या भक्तीची बीजं माझ्यात रुजली गेली.
असं करत मी मॅट्रिक झालो. पुढे माझ्या वाचनाने गती घेतली. ग्रंथालयाकडे माझी धाव जाऊ लागली. दर्शनशास्त्र यासारखे ग्रंथ मी भराभर पचवू लागलो तर तर्कतीर्थांचे संपादित खंडही माझ्या वाचनात आले. योगी अरविंद, संत ज्ञानेश्वर यांच्याकडे मी खेचला जाऊन त्यांचे साहित्य माझ्या वाचन पोतडीमध्ये पक्के बांधून ठेवले.
वाचन छंदाच्या या पार्श्वभूमीवर तुमचा शैक्षणिक प्रवास आणि करिअर कसे घडत गेले?



मला मेडिकल ला जायचं होतं, पण ते अशक्य झाल्याने आयुर्वेद शाखेत प्रवेश घेतला.
दोन-तीन वर्षात मला तो कोर्स पण सोडावा लागला. त्या दोन-तीन वर्षात आयुर्वेदात मला पदार्थविज्ञान असा विषय होता व त्या दोन वर्षात भारतीय दर्शने या विषयाचा माझा पुन्हा परिचय झाला. सांख्य, वैशेषिक, जैन, बौद्ध ही सगळी दर्शने परत अभ्यासता आली. नंतर मग ८७ साली मी खामगावला होमिओपॅथीला ॲडमिशन घेतली. शिक्षण पूर्ण झाल्यावर जालन्यामध्येच एका डॉक्टरांकडे मी माझी प्रॅक्टिस सुरू केली. तीन-चार वर्षात माझं लग्न झालं आणि मग सौभाग्यवतींना राहुरी इथे नोकरी मिळाल्यामुळे मीही राहुरीला प्रॅक्टिस करायचं ठरवलं व आम्ही इथे आलो. इथे आल्यावर मला एम.डी. साठी ॲडमिशन मिळत होती. परंतु मी विचार केला की एम.डी करून मी परत प्रॅक्टिसच करणार आहे, मग ते शिकण्यापेक्षा मला ज्या विषयाची आवड आहे ते आपण शिकावं. मग मी पुणे विद्यापीठातून एक्स्टर्नली तत्त्वज्ञानामध्ये बी.ए. करायचं ठरवलं. बी.ए. आणि एम.ए. झाल्यावर परत पी.एच.डी. लाही ॲडमिशन मिळत होती. परत तेव्हा असाच विचार मनात आला, की पी.एच.डी. करून मी वेगळं काय साध्य करणार आहे! पण त्या काळात माझा तत्त्वज्ञानाचा अभ्यास मात्र पक्का झाला. यादरम्यान गुरु कसे भेटतील या प्रश्नाने मला पछाडले होते म्हणून मी दासबोध देखील वाचून काढला.
**आपण गुरूंच्या शोधात असताना गुरुप्राप्ती कशी झाली?**
शिक्षणासाठी मी खामगावात होतो. मी जेव्हा दासबोध वाचत होतो तेव्हा माझा मित्र मला म्हणाला, अरे, तुला गुरू हवेत, त्यासाठी तू दासबोध वाचतोयस, मग तू साखरखेर्ड्याला जा व प्रल्हाद महाराजांचा अनुग्रह घे.
पण मी जरा आगाऊपणाने मित्राला म्हटले, की जर खरे गुरू असतील तर मला ते बोलावून घेतील.
पण त्या दिवशी रात्रीच मला स्वप्नदृष्टांत झाला आणि त्यात प्रल्हाद महाराजांनी मला सांगितलं, की तुझं शिक्षण पूर्ण झालं की तुला अनुग्रह मिळेल. आणि झालंही तसंच.
**आपल्या लेखन साहित्य, प्रकाशित पुस्तकं व आपणास मिळालेली लेखन साहित्या विषयाची प्रेरणा याबद्दल आपण काय सांगाल?**
साधारणपणे ११ सालापासून माझं लेखनही सुरू झालं होतं. अनेक मासिकांतून कथा लिहिल्या, ललित लेखन सुरू झालं. वर्तमानपत्रात अनेक स्तंभ लिहिले. तेव्हा लोक विचारू लागले की तुमचं पुस्तक आहे का? तोपर्यंत काही मासिकांमधून आणि दैनिकांमधून माझे ४० ते ५० ललित लेख प्रकाशित झाले होते. पुस्तक काढायचं तर ठरलं; परंतु ते काढायचं म्हणजे काय करायचं याची मला काही कल्पना नव्हती. नंतर २००६ साली माझं अक्षर सावल्यातील मनोराज्ये हे पुस्तक प्रकाशित झालं आणि २००७ साली त्या पुस्तकाला अनंतफंदी पुरस्कार मिळाला. मुंबईच्या सुमेरु प्रकाशनातर्फे ते पुस्तक प्रकाशित झालं होतं. सुमेरूचे प्रकाशक श्री. अजदाते यांनीच मला पुढे लिखाणाला प्रवृत केलं, त्यांनी मला १४ ते २० वयातील मुलांसाठी म्हणजे कुमारांसाठी संत साहित्य लिहिण्यास सांगितलं, त्यानुसार संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्यावर मी पुस्तके लिहिली. त्या पुस्तकालाही मला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला.
रुडयार्ड किपलिंग यांची किम नावाची कादंबरी वाचत असताना त्यांचा अनुवाद करण्याचा योगही आला आणि अनेक पुस्तकांच भाषांतर माझ्याकडून झालं. म्हणजे अंदाजेसुमारे २०-२१ पुस्तके.
महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशना अंतर्गत बरीच पुस्तक मी लिहिली. भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चात्त्य तत्त्वज्ञान याविषयीचे तीन खंड संपादन व प्रस्तावना लेखन करण्याचे काम माझ्याकडे आले आणि हे तिन्ही खंड महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित झाले. हे खंड प्रकाशित झाल्यानंतर संभाजीनगर येथील श्री विद्या बुक्स यांनी मला भारतीय दर्शन या विषयावर लिहिण्याबद्दल विचारले. हा माझा आवडता विषय होता आणि २०२४ मध्ये भारतीय तत्वज्ञान स्वरूप आणि सिद्धांत या नावाचं माझं सुमारे ६०० पानांचं पुस्तक प्रकाशित करण्यात आलं. अशा लिखाणातून माझी आध्यात्मिक व तत्त्वज्ञान विषयक गोडी वाढत गेली. वाचन, चिंतन आणि गुरुकृपा यामुळे माझ्याकडून आज ३७ पुस्तकांची निर्मिती झाली आहे.
आपलं लेखन सामान्य माणसाला कसं उपयोगी असेल?
अनेकदा असं वाटतं की, एवढं वाचून सामान्यांना काय करायचे आहे? हे सगळं पंडितांचं काम आहे; पण ते तसं नाही. कारण या सर्व अभ्यासातून तुमची एक विशिष्ट धारणा तयार होते, चित्ताची वृत्ती स्थिर होत जाते आणि ती पुढे तुम्हाला साधनेला उपयोगी पडते.
आजच्या पिढीला काय संदेश द्याल? शालेय जीवनापासून वाचनांचा छंद जोपासला जावा, पालकांनी मुलांच्या वाचनावर भर द्यावा. संत साहित्याची गोडी लागण्यासाठी त्याचे वाचन आणि अभ्यास करावा. कारण वाचन संस्कार हा जीवन संस्कार आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ⁕संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी अभय कटारिया



अहिल्यानगर - येथील सीए अभय कटारिया यांची नुकतीच अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल सीए अभय कटारिया यांचा रमेश गुंदेचा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी किशोर गांधी, सुभाष भंडारी, किशोर श्रीश्रीमाळ, पारस गुंदेचा, सुरेश मुनोत, विलास गुंदेचा, पवन गुंदेचा आदी उपस्थित होते. सत्कारास उत्तर देताना सीए अभय कटारिया म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या माध्यमातून अधिकाधिक चांगले काम करू. आपणावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवून सीए बांधवांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू, असे सांगितले.

### योग विद्याधाम चे १ तारखेपासून योगाच्या विविध वर्गाची सुरवात

अहिल्यानगर- येथील योग विद्याधाम तर्फे दि . १ मार्चपासून प्राथमिक योगासन वर्ग, वजन कमी करण्यासाठी स्थिरता निवारण वर्ग ( ), विकार ग्रस्तांनसाठी संजीवन वर्ग व प्राणायाम वर्ग सुरू होणार असल्याची माहिती कार्यवाह श्री बबन बारगळ यांनी दिली. वरील योग वर्ग हे योग भवन,ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूल मागे, कुष्ठधाम रोड, सावेडी व नवले हॉल, गुलमोहर रोड येथे होणार आहेत. तरी या सर्व प्रकराच्या वर्गाच्या संधीचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन कार्याध्यक्ष सौ. मीना देशपांडेच यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी फोन नं. ०२४१- २४२१२५५ वर संपर्क साधावा.

### प्रभाग क्रमांक १४ मध्ये कचरा संकलनाचा बोजवारा - गणेश भोसले

अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये



गेल्या काही दिवसांपासून साफसफाईची दयनीय अवस्था निर्माण झाली आहे.कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे माजी उपमहापौर तथा नगरसेवक गणेश भोसले यांनी महापालिका प्रशासनाकडे ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे. भोसले यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले की, प्रभागातील साफसफाईचे काम सुसूत्र व्हावे यासाठी महापालिका प्रशासनाने प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला ठराविक भागाची जबाबदारी द्यावी. त्या भागात स्वच्छता न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर थेट कारवाई करता यावी. यामुळे नागरिकांना स्वच्छतेचा लाभ मिळेल आणि कामात जबाबदारी येईल. त्यांनी पुढे सांगितले की, सफाई कर्मचाऱ्यांनी गोळा केलेला कचरा ठेकेदाराकडून नियमित व वेळेवर उचलला जात नाही. परिणामी रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग पडून राहतात. मोकाट जनावरे त्यात चरतात, तर वाऱ्यामुळे कचरा रस्त्यावर विखुरतो. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रभाग क्रमांक १४ मधील बुरुडगाव रोड, चंदन इस्टेट, राजज्योती नगर, समर्थ नगर, जुने आयटीआय गेट, भोसले आखाडा परिसर या भागांमध्ये हा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेकदा तक्रारी करूनही ठेकेदाराकडून सुधारणा होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. गणेश भोसले यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात स्पष्ट नमूद केले आहे की, सफाई ठेकेदाराविरुद्ध तातडीने दंडात्मक कारवाई करून कचरा संकलनाचे नियोजन काटेकोरपणे करावे. शहर स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी जबाबदारीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, आणि ढिलाई करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

## मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी सप्ताह साजरा करून त्यात मुलांनी रंग साहित्याचे या विषयांतर्गत वेगवेगळ्या साहित्याप्रकारांची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. त्याच बरोबर २७ फेब्रुवारी या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या व कुसुमाग्रज्यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात मराठी भाषेचा इतिहास, समृद्ध परंपरा आणि आधुनिक काळातील महत्त्व यावर मार्गदर्शन शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी उत्कर्ष भोर याने केले, तसेच विद्यार्थ्यांसाठी म्हणी, भाषिक ज्ञान व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मराठीच्या विभाग प्रमुख सीमा कोटस्थाने यांनी अपरिचित कुसुमाग्रज या विषयावर बोलतांना कुसुमाग्रजांचा जीवनपट उलगडून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. सॅजिटेरियस ग्रुपच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले.त्यासाठी मराठीच्या शिक्षिका सुमन कदम यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या गीता तांबे यांनी मराठी भाषा जपणे व दैनंदिन जीवनात तिचा अभिमानाने वापर करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगितले.

मराठी दिनाचे औचित्य साधून शाळेच्या वतीने मराठी विषय शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

अमोल धोपावकर यांनी आभार प्रदर्शन केले.

प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा, संस्थेचे अध्यक्ष श्री.राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोदर माखिजा विश्वस्त श्री. महेश मध्यान श्री. सुरेश हिरानंदानी , श्री. राजकुमार गुरुनानी श्री. हरेश मध्यान यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची आहे असे प्रतिपादन केले.

शिक्षिका सौ. वैशाली शिंदे व सर्वांच्या सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

## रविंद्र राजाराम राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा नांदूर पठारचे माजी सरपंच रविंद्र राजाराम राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ९ वाजता कार्यक्रमास प्रारंभ होणार असून निलेश लंके प्रतिष्ठान आणि रविंद्र राजदेव यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात रक्तदान शिबिराने होणार असून त्याचवेळी सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप, रेशनकार्ड वितरण, बांधकाम कामगार कार्ड नोंदणी व वितरण तसेच बांधकाम कामगारांना भांडी वाटप असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

दुपारी १ वाजता मंगरूळ येथील स्वप्नवेध अनाथालयातील विद्यार्थ्यांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर टाकळी ढोकेश्वर येथे अपंग व मुख-बधिर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात येणार आहे. संध्याकाळी ७ वाजता राणीताई लंके यांच्या उपस्थितीत 'खेळ पैठणीचा' हा विशेष कार्यक्रम होणार आहे. तसेच 'गाडी घुंगराची' फेम विलासराव अटक यांची उपस्थिती कार्यक्रमाला आकर्षण ठरणार आहे. यानंतर अभिष्टचिंतन सोहळा व भोजन समारंभाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

रविंद्र राजदेव हे पारनेर तालुक्यात सामाजिक कार्यासाठी ओळखले जाणारे व्यक्तिमत्त्व असून ते निलेश लंके प्रतिष्ठान चे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आरोग्य, शिक्षण व शासकीय योजनांशी संबंधित अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.

त्यांचा वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा दिवस नसून समाजसेवेचा संकल्पदिन म्हणून साजरा केला जात आहे. या उपक्रमांमुळे अनेक गरजू नागरिकांना थेट लाभ होणार असून स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## हनुमान विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**टाकळी खातगाव–** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा (एन. एम. एम. एस.) मध्ये हनुमान विद्यालयाचे तेरा विद्यार्थी पात्र ठरले आहेत, अशी माहिती प्राचार्य दिलीप बाक्षे यांनी दिली.
केंद्र शासनाच्या मानव संशोधन मंत्रालयाच्या वतीने आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम.एस. ही परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १२ हजार रूपये शिष्यवृत्ती दिली जाते. बारावीपर्यंत ही शिष्यवृत्ती दिली जाते.

तन्वी ठागणे ही विद्यालयात प्रथम आली. सार्थक बांदल ही द्वितीय तर अंकिता सातपुते ही तृतीय आली. प्रतिक्षा कळमकर, दिव्या जाधव, स्वरा कर्डिले, सार्थक तागड, श्रेया घोलप, मानस कोरडे, आर्य शिंदे, सौरभ बांदल, समर्थ कुलट, ज्ञानेश्वरी जाधव हे शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांना उपपाचार्य विलास वैराळ, पर्यवेक्षक बाळासाहेब आडसूळ, शिक्षक साहेबराव आहेर, भरत आहेर, बाळासाहेब खिलारी, शालन दुधाडे, श्याम पवार, एस. व्ही. पानसरे, दिव्या खेसे आदींचे मार्गदर्शन लाभले. श्रीरंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष श्रीप्रकाश बोरा, उपाध्यक्ष जितेंद्र बोरा, सरपंच राजेंद्र नरवडे, खातगावच्या सरपंच रूथ्रा वैराळ आदींनी अभिनंदन केले आहे.

## केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे दणदणीत यश

**३१ विद्यार्थिनी मारली बाजी । गुणवंत मुलींनी उंचावला शाळेचा नावलौकिक**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा () मध्ये यंदा घवघवीत यश संपादन करत शाळेची मान उंचावली आहे.
दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन व शिष्यवृत्ती मिळावी या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते. यंदा विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थिनींनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल ३१ विद्यार्थिनीना यश मिळालेले असून, हा निकाल अत्यंत अभिमानास्पद मानला जात आहे.यावेळी

प्रथम क्रमांक: कुमारी प्रांजल वाघमारे १४६ गुण, द्वितीय क्रमांक: कुमारी अक्षरा झाडे १२३ गुण, तृतीय क्रमांक: कुमारी सेजल शिंदे ११७ गुण, प्रांजल वाघमारे हिने १४६ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे संपूर्ण विद्यालयात आनंदाचे वातावरण पसरले आहे. अक्षरा झाडे आणि सेजल शिंदे यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष दिली आहे.

या यशामागे विद्यार्थिनींची जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. जालिंदर सातपुते, जयश्री कोतकर, मेघा पोपळघट, समृद्धी गरड, नितीन गोफणे, प्रतिभा खळेकर यांनी विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी संपूर्ण उपक्रमावर बारकाईने लक्ष ठेवून विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. नियमित मार्गदर्शन सत्रांमुळे विद्यार्थिनींची तयारी अधिक भक्कम झाली.
यावेळी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर म्हणाले केडगावच्या शैक्षणिक क्षेत्रात या यशाने नवे पर्व सुरू केले असून, विद्यालयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. की योग्य मार्गदर्शन,परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते.आर्थिक अडचणी असूनही गुणवत्तेच्या जोरावर मोठे यश मिळवता येते,असे मत त्यांनी व्यक्त केले.व विद्यार्थिनी व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शहर व उपनगरामध्ये अद्ययावत भाजीमंडई निर्माण करा : महापालिका आयुक्तांकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरात व उपनगरात भाजीपाला व फळे विक्रेत्यांना हक्काची अशी पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शहराच्या विस्तारित भागांमध्ये अद्ययावत भाजी मंडई निर्माण करावी, अशी मागणी शहरातील रहदारी समस्येचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्री ललवाणी यांनी निवेदनात पुढे म्हटले आहे की, आपल्या शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असून उपनगरांमध्येही नागरी क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. संपूर्ण महापालिका हद्दीमध्ये गंजबाजार येथे एकमेव भाजीमंडई अस्तित्वात आहे. याचबरोबर नालेगाव अमरधाम समोर गाडगीळ पटांगण येथे भाजीपाला फळे - विक्रेत्यांना तात्पुरती सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त शहरात व उपनगरात भाजीपाला - फळे विक्रेत्यांना हक्काची अशी पुरेशी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सध्या ऊन वारा पावसामध्ये जागा मिळेल तिथे, रस्त्याच्या कडेला भाजीपाला फळे विक्रेत्यांना प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपला व्यवसाय करावा लागत आहे. याच बरोबर काही भागात रस्त्यावरील भाजीपाला विक्रीमुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते. महापालिका हद्दीतील विस्तारित उपनगरांमध्ये अद्ययावत अशा भाजी मंडया निर्माण केल्यास भाजीपाला - फळे विक्रेत्यांना आपली हक्काची व पुरेशी जागा उपलब्ध होईल. याचबरोबर नगरकरांना देखील भाजीपाला - फळे खरेदीची मोठी सोय निर्माण होईल आणि शहरातील वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात आपोआप संपुष्टात येईल. या सर्व बाबींचा विचार करून महापालिका प्रशासनाने महापालिका हद्दीतील केडगाव, नागापूर, बोल्हेगाव, सावेडी या उपनगरांमध्ये अद्ययावत अशा भाजी मंडई निर्माण कराव्यात.

अशी मागणी श्री ललवाणी यांनी महापालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## ग्राहक आयोगाचे नवे अध्यक्ष म्हणून सादिक अली सय्यद यांच्याकडे कार्यभार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ग्राहक आयोग न्यायालयाचे नवीन अध्यक्ष म्हणून श्री. सादिक अली सय्यद यांनी आपल्या पदाचा कार्यभार नुकताच हाती घेतला आहे. ग्राहक आयोगाचे वकील बारचे पदाधिकारी व वकील यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्यांचे त्यांनी निरसन केले व आयोगाच्या कामाची व कार्यपद्धतीची प्रगती कशी होईल, यासाठी निवडीनंतर चर्चा केली.

यावेळी विविध वकिलांनी केलेल्या सूचनांची नोंद घेऊन आयोगाचे काम व खटले लवकरात लवकर निकाली कसे निघतील, यासाठी वकिलांनी सामंजस्याने काम करावे, अशा सूचना त्यांनी केल्या. आयोगाच्या वकील बारच्या उपाध्यक्ष ॲड. सुविद्या तांबोळी व ॲड. सोनी व ॲड. सुरेश लगड यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व बारच्यावतीने स्वागत करण्यात आले.

नवे अध्यक्ष सलग १५ दिवस नगर आयोगात काम करणार असून, आयोगाचे इतर १५ सदस्य पण खटल्याबाबतीत निर्णय घेतील व प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे नवीन अध्यक्ष श्री. सादिक अली सय्यद यांनी सूचित केले.

## अहमदनगर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त स्नेहमेळावा

**१९५९ ते २०१६ च्या बॅचमधील सुमारे ८० माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती; आठवणींना उजाळा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**अहमदनगर महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था आणि अहमदनगर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. १९५९ सालापासून ते २०१६ पर्यंतच्या विविध बॅचमधील सुमारे ८० माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित होते. अनेक दशकांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत महाविद्यालयीन जीवनातील अनुभव कथन केले.

या मेळाव्यास जेष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. जवाहर मुथ्था, रयत शिक्षण संस्थेत कार्यरत असलेले माजी प्राचार्य डॉ. विश्वास काळे, महाराष्ट्र राज्य माहिती व जनसंपर्क विभागाचे निवृत्त संचालक देवेंद्र भुजबळ, 'समाचार' वृत्तपत्राचे संपादक डॉ. ज्ञानेश कुलकर्णी, बाळासाहेब ढगे, शंकरराव राऊत, डॉ. अरविंद गुगळे तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया मधील निवृत्त अधिकारी विजय तांबोळी यांच्यासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संस्थेचे उपाध्यक्ष प्रशांत दहिभाते प्रमुख पाहुणे



म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सभागृहात पार पडलेल्या या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणातील आणि एकूणच व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीतील महाविद्यालयाच्या भूमिकेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अनेकांनी माजी प्राचार्य डॉ. जे. बार्नबस, डॉ. मनोरमा बार्नबस आणि डॉ. सरला बार्नबस यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल ऋण व्यक्त केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. नोएल पारगे यांनी महाविद्यालयाच्या दीर्घ शैक्षणिक परंपरेचा गौरव करताना माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा विशेष उल्लेख केला. एका संस्थेची खरी ओळख तिच्या इमारतींमध्ये नसून विद्यार्थ्यांच्या कार्यात आणि मूल्यांमध्ये असते. आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असलेले आपले माजी विद्यार्थी हेच महाविद्यालयाच्या परंपरेचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या अनुभवांतून आणि संघर्षातून सध्याच्या पिढीला प्रेरणा मिळेल. संस्थेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच, माजी विद्यार्थ्यांशी सातत्यपूर्ण संवाद ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी माजी विद्यार्थी संस्थेचे सचिव डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले व पुढील स्नेहमेळाव्यास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. स्नेह, संवाद आणि आठवणींच्या वातावरणात हा मेळावा संस्मरणीय ठरला.

# शहरात दिव्यांग विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी

**। ज्योत्स्ना उद्योग केंद्राच्या ३०व्या वर्धापन दिनानिमित्त उपक्रम; तज्ज्ञ डॉक्टरांकडून मशीनद्वारे तपासणी**
**। पालकांसाठी आरोग्य, लैंगिक शिक्षण व वयात येण्याच्या प्रश्नांवर मार्गदर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील टिळक रोड येथील मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचालित मतिमंद मुलांची शाळा व ज्योत्स्ना उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. ज्योत्स्ना उद्योग केंद्राच्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात शाळेतील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांची आधुनिक मशीनद्वारे नेत्र तपासणी करण्यात आली.

या शिबिरात रेटिना तज्ज्ञ डॉ. क्षितिज तांबोळी यांनी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना मोफत औषधांचेही वितरण करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

कार्यक्रमास ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेचे प्रमुख भाऊसाहेब कदम, मतिमंद मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा म्हातारदेव–बनकर, मानसशास्त्रज्ञ माधवी कुठे, वाचा उपचार तज्ज्ञ विक्रम उंडे, विशेष शिक्षिका ज्योती भवारी, निदेशक सुशीला



गायकवाड, विजय बळीद, अल्लाउद्दीन शेख, अशोक सत्रे, बाळू मकरंद यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. क्षितिज तांबोळी हे अनुभवी नेत्रतज्ज्ञ असून, मागील एका वर्षात त्यांनी ४० हून अधिक मोफत नेत्र तपासणी शिबिरे घेऊन गरजू रुग्णांना सेवा दिली आहे. त्यांनी बेंगळुरू, हैदराबाद, नाशिक यांसारख्या शहरांतील नामांकित संस्थांमध्ये कार्य केले असून, गेल्या वर्षभरापासून ते अहिल्यानगर येथे सेवा देत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांचे सातत्यपूर्ण मोफत मार्गदर्शन लाभत आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. सुचित तांबोळी यांनी पालकांशी संवाद साधत दिव्यांग मुलांच्या आरोग्याशी संबंधित विविध समस्या, वयात येण्याच्या टप्प्यातील शारीरिक व मानसिक बदल, तसेच लैंगिक शिक्षणाचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित पालकांनी विचारलेल्या शंकांचे समाधानकारक निराकरण करून त्यांनी पालकांना योग्य मार्गदर्शन दिले. केंद्र प्रमुख भाऊसाहेब कदम म्हणाले की, दिव्यांग मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नेत्र तपासणीसारखा मूलभूत आरोग्य विषय अनेकदा दुर्लक्षित राहतो. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांचे आरोग्य तपासले गेले, ही आमच्यासाठी समाधानाची बाब आहे. भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे सातत्य ठेवण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापिका पुष्पा म्हातारदेव–बनकर म्हणाल्या की, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक आरोग्याची सांगड आवश्यक आहे. नेत्र तपासणीमुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टीदोषांचा वेळीच शोध लागतो आणि त्यांच्या शिक्षण प्रक्रियेत होणारे अडथळे दूर होतात. पालकांनीही अशा शिबिरांना सक्रिय प्रतिसाद देऊन मुलांच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे त्यांनी आवाहन केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवात कर्तृत्ववान व्यक्तींचा होणार गौरव

**पुरस्कारासाठी २८ मार्चपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जय मल्हार शैक्षणिक आणि बहुउद्देशीय सामाजिक संस्था व यशवंत सेना अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या सोहळ्यात पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कांतीलाल जाडकर यांनी दिली आहे.



या जयंती उत्सवानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, शिक्षक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय तसेच पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यवर व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. समाजकारण आणि लोककल्याणाच्या कार्याला चालना देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्कार', 'युवा गौरव पुरस्कार', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार', 'रणरागिणी पुरस्कार', 'छत्रपती शिवाजी महाराज जीवनगौरव पुरस्कार', 'महाराष्ट्र भूषण' तसेच 'समाज भूषण' असे विविध पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या सर्व पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह व मानपत्र असे असणार आहे.

समाजातील कार्यकर्ते, संस्था, नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी योग्य उमेदवारांचे प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुकांनी संबंधित व्यक्तीची माहिती, कार्याचा तपशील आणि आवश्यक कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात तयार करून दि. २८ मार्चपर्यंत ८८०५९२२९६० या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे पाठवावीत, असे सांगण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाची नेमकी तारीख व कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देत त्यांच्या कार्याची दखल घेण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडणार आहे.

# दादा चौधरी मराठी शाळेत 'मराठी राजभाषा गौरव' दिन साजरा

**सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती यांच्या सहकार्याने ग्रंथालयाची स्थापना**
**मोबाईल पासून दूर राहण्यासाठी मुलांना वाचनाची प्रेरणा मिळावी – गायत्री कोल्हे**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती या संस्थेची स्थापना २००७ साली अनुराग अग्रवाल यांनी केली आहे. वाचन प्रकल्प हा उद्देश ठेवून संस्थेने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना साडेतीनशे पुस्तके नुसार माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना एक हजार पुस्तके मोफत देण्याचे काम सुरू केले आहे.अहिल्यानगर येथे ६९ शाळेमध्ये हा वाचन प्रकल्प सुरू आहे.सध्याच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहण्यासाठी वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक आहे.वंचित मुलांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देणे,ज्ञानाचा प्रसार करणे, मुलांचा सर्वांगीण विकास करणे. हा उद्देश ठेवून संस्थेचा वाचन प्रकल्प कार्यक्रम सुरू आहे. असे प्रतिपादन अक्षर भारतीचे शाळा समन्वय गायत्री कोल्हे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेत ''मराठी राजभाषा गौरव'' दिनानिमित्त सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती संस्थेच्या सहकार्याने ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी अक्षर भारती शाळा समन्वयक गायत्री कोल्हे,कविता गावित,मुख्याध्यापक सुभाष येवले,दिलीप परसपाटकी,मीनाक्षी गणगले ,सुनिता देवराव,शितल पवार,प्रिया आहिरे,मंगल पवार आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापक सुभाष येवले म्हणाले,मराठी राजभाषेचा गौरव दिन उत्साहाने साजरा होत आहे. वाचन प्रकल्प हा अक्षर भारती संस्थेचा उपक्रम कौतुकास्पद आहे.मुलांसाठी सुरू केलेल्या ग्रंथालयात

घडणारी शाळा,चला गाणी गाऊया,गाण्याचे पुस्तक, मामाच्या गावाला,सुभाष चंद्र बोस,शिवरायांची राजमुद्रा, चतुर बिरबल,माझी शाळा, मित्र असावे तसे,शहाणी सोना अशी ऐतिहासिक,वैज्ञानिक, गोष्टीची, मनोरंजन व चित्र स्वरूपातील शैक्षणिक पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया अहिरे यांनी केले.तर आभार दिलीप परसपाटकी यांनी मानले.

# सारडा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'विरामचिन्हे दिवस' साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने २६ फेब्रुवारीला विरामचिन्हे दिवस साजरा करण्यात आला. मराठी भाषेसाठी शब्दकोश, व्याकरण,लेखन,संपादन,भाषांतर असे अनेक प्रकारचे काम मेजर थॉमस कँडी यांनी केले. विरामचिन्हांची परिभाषा ही १६ पानांची पुस्तिका हे त्यांचे मराठी भाषेसाठी दिलेले सर्वात मोठे योगदान आहे. मेजर कॅन्डी यांच्या १५० व्या स्मृतिवर्षाला २६ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. त्यांच्या विरामचिन्हांची परिभाषा पुस्तिकेलाही १७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या १५० व्या स्मृतिवर्षानिमित्त २६ फेब्रुवारी रोजी विरामचिन्हे दिवस साजरा केला गेला.

या उपक्रमाला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,




कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा.वर्षा कीर्तने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित होत्या. डॉ. वर्षा कीर्तने म्हणाल्या,'' मराठी – इंग्रजी शब्दकोशकार मेजर थॉमस कँडी यांनी मराठी देवनागरीत लिहायला सुरुवात केली. आणि विरामचिन्हे पहिल्यांदा वापरली.पुढे विरामचिन्हांचा वापर लोकमान्य झाला. कॅन्डी यांचे मराठी भाषेसाठी दिलेले हे सर्वात मोठे योगदान आहे. ''

प्राचार्य माहेश्वरी गावित आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाल्या, ''आपण जेव्हा बोलतो त्यावेळी आपले बोलणे ऐकणाऱ्याला अचूकपणे कळते.ते लिहिताना मात्र प्रमाणलेखनात असणे अपेक्षित आहे. वाचताना कुठे व किती वेळ थांबायचे आणि कोणत्या शब्दावर जोर द्यायचा यासाठी विरामचिन्हांचा उपयोग करावा.

# शालिनीताई विखे पाटील यांना राज्यसभेवर संधी द्यावी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यसभेकरिता १६ मार्च ला निवडणुका होणार आहेत.राज्यसभेच्या महाराष्ट्रात ७ जागांची मुदत संपणार आहे,त्यात तीन महिला अनुक्रमे रजनीताई पाटील,प्रियांका चतुर्वेदी आणि फौजिया खान यांचा समावेश आहे. त्यामुळे महिलांचे संख्याबळ राज्यसभेत निश्चितच कमी होईल.महिलांना प्राधान्य असावे अशी प्रत्येक राजकीय पक्षाची भूमिका आहे.राज्यसभेत महिलांचे प्रश्न एक अनुभव संपन्न महिलाच मांडू शकते,त्यामुळे राज्यसभेत सौ.शालिनीताई विखे पाटील यांना राज्यसभेवर उमेदवारी द्यावी अशी मागणी माजी समाजकल्याण अधिकारी रशिक मुंनशी यांनी केली आहे.



शालिनी विखे यांच्या जिल्हा परिषदेच्या ५ वर्षाच्या कामाची दखल घेणे महत्वाचे आहे. शैक्षणिक क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या निधी व्यतिरिक्त शिरडी संस्थान कडून निधी मूलभूत सुविधाकरिता प्राप्त करणे,चारशे पेक्षा जास्त शाळा खोल्याचे बांधकाम,धोकादायक शाळा खोल्या इमारतीचे ऑडीट,शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न इ.कामे महत्वपूर्ण आहेत . जिल्हा परिषदेच्या सर्वच विभागात ,त्यातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी त्यांनी केली. त्यातच ८ मार्च महिला दिनानिमित्त अनुभवी आणि अभ्यासु,सक्षम महिला म्हणून शालिनीताई विखे पाटील यांना उमेदवारी देणे योग्य राहील, असे रफिक मुन्शी यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय पथक व आर्थिक मदत द्या – आ. काशिनाथ दाते

**संकरित गायींच्या मृत्यूंवर आमदार काशिनाथ दातेंचा पाठपुरावा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील दैठणे गुंजाळ ता. पारनेर आणि हिवरे बाजार ता. नगर परिसरात संकरित गायींमध्ये अज्ञात आजाराचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी चिंतेत आहेत. गायी अचानक एक–दोन दिवसांत आजारी पडून दगावत असल्याने पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी तातडीने राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडे यांना पत्र देवून त्वरित उपाययोजनांची मागणी केली आहे. जिल्हास्तरीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासण्या केल्या असल्या तरी आजाराचे निश्चित निदान अद्याप झालेले नाही. त्यामुळे मृत्यूंचे प्रमाण वाढत असून ग्रामीण भागातील शेतकरी



कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. पशुधन हेच उपजीविकेचे प्रमुख साधन असल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.

**शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी राज्यस्तरीय तज्ञ पशुवैद्यकीय पथक तातडीने पाठवून आजाराचे निदान करावे, विशेष आरोग्य शिबिरे व लसीकरण मोहीम राबवावी, दगावलेल्या जनावरांचे पंचनामे करून ''खास बाब'' म्हणून आर्थिक मदत जाहीर करावी तसेच भविष्यातील प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.**

**आ. काशिनाथ दाते सर,**
**(विधानसभा सदस्य)**

शेतकऱ्यांच्या पशुधनाचे रक्षण व त्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी आमदार काशिनाथ दाते सरांनी घेतलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत असून प्रभावित भागातील ग्रामस्थांनी त्यांच्या हस्तक्षेपाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# मराठी दिनानिमित्त हस्तलिखित 'ज्ञानेश्वरी'ची आर्य चाणक्यला भेट; विठ्ठल सावंत यांचा विद्यार्थ्यांना परीसस्पर्श



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथे मराठी भाषा दिन अत्यंत आगळ्या–वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी सुंदर व सुवाच्च हस्ताक्षरात लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाची प्रत शाळेला भेट देत विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारण्याचे मोलाचे धडे देण्यात आले.

जि. प. प्रशाला, नायगाव येथील निवृत्त मुख्याध्यापक विठ्ठल शंकराव सावंत यांनी उपस्थित राहून हस्तलिखित ग्रंथराज ज्ञानेश्वरीची प्रत शाळेला सुपूर्द केली. स्वागत प्रसंगी त्यांनी सांगितले की, ते भा. शि. प्र. संस्थेचे माजी विद्यार्थी असून श्री. सिध्देश्वर शैक्षणिक संकुल, माजलगाव येथील संस्कारांचे बाळकडू त्यांना आयुष्यभर प्रेरणा देत आले आहे.

सकाळच्या परिपाठात विद्यार्थ्यांना मराठी दिनाच्या शुभेच्छा देताना सावंत यांनी सुबक, डौलदार अक्षर रेखाटनाच्या क्लुप्त्या सांगितल्या. स्वतःच्या अनुभवातून त्यांनी अक्षरसेवा कशी जोपासली हे उलगडून सांगितले. अवघ्या १५ महिन्यांत भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी त्यांनी पूर्ण करून सद्गुरू चरणी अर्पण केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. ही 'ज्ञानेश्वरी' संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पूर्ण करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. मुख्याध्यापक तथा भा. शि. प्र. संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भास्कर कुलकर्णी यांनी सावंत यांचा यथोचित सत्कार केला. हस्तलिखित प्रत शालेय ग्रंथालयात जतन करून ठेवण्यात येणार असून ती प्रत आशुतोष पानगे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. या हस्तलिखित ग्रंथामुळे विद्यार्थ्यांना आदर्श लेखन कसे असावे याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. ''काना'स योग्य अंतर, मात्रा ती डोईवर, वेलांटी वा रफार डौलदार'' या ओळींचा अर्थ विद्यार्थ्यांनी ती प्रत पाहताना प्रत्यक्ष अनुभवला. मराठी भाषेचा अभिमान आणि सुलेखनाची गोडी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवणारा हा उपक्रम ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विलास खर्डेकर यांनी केले.

# शहरात मोफत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**सायबर सिक्युरिटी व डिजिटल मार्केटिंगवर भर; लाभार्थींना सहभागी होण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक–युवतींना तांत्रिक कौशल्यांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन महिन्यांच्या कालावधीचा अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षणामध्ये सायबर सिक्युरिटी ॲण्ड डेटाबेस रिकव्हरी तसेच डिजिटल मार्केटिंग या अत्याधुनिक आणि रोजगाराभिमुख विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. माहिती–तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या क्षेत्रात युवकांना सक्षम बनवणे आणि त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षणाच्या आधारे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास किंवा नोकरी मिळविण्यास सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये म्हणजे या कार्यक्रमात केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे तर उद्योजकीय कौशल्यांवरही विशेष भर दिला जाणार आहे. त्यामध्ये उद्योग उभारणीची प्रक्रिया, शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल तयार करण्याचे तंत्र, विक्री कौशल्य व उद्योग व्यवस्थापन, उद्योगांना प्रत्यक्ष भेटी, कर कायदे व परवाने (लायसन) यासंबंधी माहिती, तज्ञ मार्गदर्शकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे सहभागी युवकांना व्यवहार्य व उपयुक्त ज्ञान मिळणार आहे.

प्रशिक्षणासाठी लाभार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांसाठी वय १८ ते ४५ वर्षे, अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक, किमान दहावी उत्तीर्ण, मागील १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी, स्वयंरोजगार किंवा रोजगार करण्याची तयारीची अट आहे. यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, जातीचा दाखला, अंतिम सत्राची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, रहिवासी दाखला हे आवश्यक कागदपत्रे लागणार आहे.

इच्छुकांनी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा. अमोल गव्हाणे व तेजस वैद्य (कार्यक्रम आयोजक) यांच्याशी ९७३०८७६७८३ / ८२३७२३२४३३ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. तसेच एमसीईडीच्या अधिकृत संकेतस्थळावर .../ या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करता येईल. जास्तीत जास्त युवक–युवतींनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बार्टीचे प्रकल्पाधिकारी दिलावर सय्यद व महाराष्ट्र उद्योजकता केंद्राचे प्रकल्प अधिकारी रमेश जाधव यांनी केले आहे.

(पान १ वरून)

## छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

(स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस निरीक्षक महादेव गोमारे (पो. ठाणे पैठण) तसेच त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. ग्रामीण पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे पैठण परिसरातील अवैध जुगार व्यवसायाला मोठा आळा बसणार असून, नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## शरद पवार मोठे नेते, पण शिवसेना राज्यसभेच्या जागेचा दावा सोडणार नाही

राज्यसभा या दोन वेगवेगळ्या जागा आहेत. दोन वेगळे विषय आहेत, विधानपरिषदेत उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ पूर्ण होणार असल्याने ती जागा सुद्धा अर्थातच आमची असेल, असेही सरदेसाई यांनी स्पष्ट केले.